Lenovo comp. am/14/56

# बृहन्मुंबई महानगरपालिका - शिक्षण विभाग

क्र.एसआरएससी/3044 दि.28.02.2014

उपशिक्षणाधिकारी परि.- 1, 2, 3, 4,5 ,6, 7

**विषयः** 1) संत निरंकारी मंडळ, 2) श्रीमद पुरुषार्थ ग्रंथराज अनिरुध्द धाम, 3) श्री. अंबिका योग कुटीर, 4) विपश्यना ध्यान साधना, 5) जनरल सर्व्हिस ऑफीस ऑफ अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस इंडीया, 6) ज्ञान विस्तारक संघ निर्मल निकेतन, 7) श्री. हरी जालान द लाईफ इंटरनल ट्रस्ट यांना त्यांच्या उपक्रमाकरीता दिलेल्या शाळांच्या वर्गखोल्या/ सभागृह/ जागेबाबत निष्कासनाची कार्यवाही न करण्याबाबत.

**संदर्भ :** 1) no. DMC/Edu./4288 dt. 10.02.2014 (पृ.क्र. टि-15)

2) no. AMC/C/9020 dt. 17.02.2014 (पृ.क्र. टि -15)

3) no. DMC/Edu./1794AMC dt. 24.02.2014 (पृ.क्र. टि- 16)

महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील शालेय इमारतीमधील वर्गखोल्या या शैक्षणिक व अशैक्षणिक उपक्रमाकरीता बाह्य संस्थांना दि. 13.01.2010 पूर्वी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

मुंबईतील महानगरपालिकेच्या शाळांमधील शैक्षणिक व अशैक्षणिक उपक्रमाकरीता बाह्य संस्थांना उपलब्ध करुन दिलेल्या वर्गखोल्यांपैकी 628 वर्ग अशैक्षणिक उपक्रमासाठी (Non Educational Activity साठी) विविध संस्थांना दिलेल्या आहेत. मध्यंतरीच्या काळात महापालिका शालेय इमारतीतील अनुज्ञ व अनुमती तत्वावर दिलेल्या वर्गखोल्या बिगर शैक्षणिक उपक्रमाकरीता दिलेल्या शाळांच्या वर्गखोल्या/ सभागृह/ जागा रिक्त करुन घेण्याची कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधित उपशिक्षणाधिकारी यांना आदेश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने संबंधित उपशिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या अखत्यारीतील बिगर शैक्षणिक उपक्रमाकरीता दिलेल्या वर्गखोल्या रिक्त करण्याची कार्यवाही चालू आहे.

तद्अनुषंगाने सद्यस्थितीत संत निरंकारी मंडळ व श्रीमद पुरुषार्थ ग्रंथराज अनिरुध्द धाम यांना उपलब्ध करुन दिलेल्या शाळांच्या वर्गखोली/ सभागृह/ जागा यांना शैक्षणिक वर्ष 2013-14 मध्ये नुतनीकरण परवानगी न दिल्यामुळे संबंधितांकडून विनंती अर्ज आलेला आहे. **सदर संस्थांना उपलब्ध करुन दिलेल्या वर्गखोल्या या संबंधित संस्थांद्वारे शालेय वेळेनंतर किंवा रविवार व सुटीच्या दिवशी वर्गखोल्या योगाभ्यास, ध्यानधारणा व सामाजिक उपक्रमांकरीता वापरल्या जातात.** सदर उपक्रमांना महानगरपालिका शाळांतील वर्गखोल्या अनुज्ञ व अनुज्ञापन तत्वावर दिल्या कारणाने शैक्षणिक अध्यापनामध्ये व्यत्यय निर्माण होत नाही. तसेच आठवड्यातून एकदा, किंवा शनिवार, रविवारी वर्गखोली/ सभागृहाचा वापर करण्यात येतो तसेच वर्गखोल्यांचा वापर हा शालेय वेळेनंतर होत असल्याकारणाने सदर वर्गखोल्यांच्या चाव्या हया संबंधित संस्थांच्या ताब्यात नसतात.

सदर संस्थांच्या कार्यामुळे शैक्षणिक अध्यापनामध्ये व्यत्यय येत नसल्याकारणाने वर नमूद केलेल्या पार्श्वभूमीवरील 1) संत निरंकारी मंडळ, 2) श्रीमद पुरुषार्थ ग्रंथराज अनिरुध्द धाम, 3) श्री. अंबिका योग कुटीर, 4) विपश्यना ध्यान साधना, 5) जनरल सर्व्हिस ऑफीस ऑफ अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस इंडीया, 6) ज्ञान विस्तारक संघ निर्मल निकेतन, 7) श्री. हरी जालान द लाईफ इंटरनल ट्रस्ट यांना उपक्रमांकरीता या अगोदर दिलेल्या आदेशाप्रमाणे निष्कासनाची कार्यवाही थांबवून परिपत्रक क्र.SRSC/3943 दि. 29.01.2008 अन्वये व क्र.SRSC/3943 दि. 01.02.2008 पारित केलेल्या या संस्थांची परवानगी रद्द न करता सदर संस्थांच्या निष्कासनाच्या कार्यवाहीस मा. अति. आयुक्त (शहर) यांनी महानगरपालिकेच्या **शांळांमधील उपलब्ध करुन दिलेल्या वर्गखोल्या/ सभागृहाचा जेथे वापर आठवड्यातून एकदा, शनिवार, रविवारी किंवा सुटीच्या दिवशी वर्गखोली/ सभागृहाचा वापर होतो अशा संस्थांविरुध्द निष्कासनाची कार्यवाही रद्द करण्यात यावी.**

1) संत निरंकारी मंडळ, 2) श्रीमद पुरुषार्थ ग्रंथराज अनिरुध्द धाम, 3) श्री. अंबिका योग कुटीर, 4) विपश्यना ध्यान साधना, 5) जनरल सर्व्हिस ऑफीस ऑफ अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस इंडीया, 6) ज्ञान विस्तारक संघ निर्मल निकेतन, 7) श्री. हरी जालान द लाईफ इंटरनल ट्रस्ट यांना **13 जानेवारी 2010 पुर्वी उपलब्ध करुन दिलेल्या वर्ग / सभागृहाचीच परवानगी / नुतनीकरण करण्यात यावे. नव्याने कुठलेही वर्गखोली अथवा सभागृह देण्यात येवू नये.** याची नोंद घ्यावी.

आपल्या माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

(sd/- 28/02/14)
शिक्षणाधिकारी (प्र.)

प्रत :

मा. अति. आयुक्त (शहर)

आपल्या माहितीकरीता सविनय सादर

– sd –
शिक्षणाधिकारी (प्र.)

मा. उपायुक्त (शिक्षण)

आपल्या माहितीकरीता सविनय सादर

– sd –
शिक्षणाधिकारी (प्र.)

प्रत: माहितीकरीता

1) उपप्रमुख लेखापाल (शि. नि.)

2) श्रीमद् पुरुषोत्तम ग्रंथराज अनिरुध्द धाम

3) संत निरंकारी मंडळ

बृहन्मुंबई महानगर पालिका
उप शिक्षणाधिकारी
परिमंडळ क्र. २ यांचे कार्यालय
03 MAR 2014
दिनांक 5590
क्रमांक

AO(S) F/S FN G/S GN

कार्यालय
पाहिले. दफ्तरी दाखल करावे ~~परिपत्रकाच्या फाईल मध्ये~~ परिपत्रकाप्रमाणे.
उपशिक्षणाधिकारी परि. क्र. २ (प्र.)